ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०२०/प्र.क्र. ८९/२०/शिक्षण १

९ वा मजला, नविन मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

तारीख: १३.१२.२०२२

वाचा : १) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५

२) शासन अधिसूचना क्रमांक: एनयुआर २०१८/प्र.क्र.१४५/१८/शिक्षण १, दि. ३०.१०.२०१८

३) समक्रमांकित शासन पत्र दि. १९.०३.२०२१

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे पत्र , क्र.एफआरए-२०२२/प्र.क्र.१३९/तांशि-४, दि.०३.११.२०२२

**प्रस्तावना :**

राज्यामध्ये परिचर्या विषयक अभ्यासक्रमाचे पदविका स्तरावर ए.एन.एम. व जी.एन.एम. इत्यादी अभ्यासक्रम राबविले जातात. संदर्भ क्र.१ येथील अधिनियमातील कलम २ (r) व कलम ३(१) व ३(२) मधील तरतुदीनुसार शासनाने संदर्भ क्र.२ येथील दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ए.एन.एम. व जी.एन.एम. हे पदविका अभ्यासक्रम "व्यावसायिक अभ्यासक्रम" म्हणून घोषित केले आहेत.

२. उक्त तरतुदीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रम घोषित करण्यात आल्यानंतर अशा अभ्यासक्रमाच्या खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या शुल्काची निश्चिती करणे व नियमन करणे हे शुल्क नियामक प्राधिकरणामार्फत केले जाणे अपेक्षित होते. त्यानुसार सन २०१९ पर्यंत ही कार्यवाही शुल्क नियामक प्राधिकरणामार्फत केली जात होती.

३. तथापि, सदर अधिनियमातील कलम २ (r) व कलम ३(१) व ३(२) मधील तरतूद विचारात घेता विद्यापीठाशी संलग्नित व्यवसायीक अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चिती ही शुल्क नियामक प्राधिकरण यांच्यामार्फत केली जाते. ए. एन. एम. व जी. एन. एम. हे जरी व्यावसायीक अभ्यासक्रम असले तरी ते महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नित आहेत. त्यामुळे ते शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कार्यकक्षेत येत नसल्याने त्यांची शुल्क निश्चिती करण्यात येणार नसल्याचे शुल्क नियामक प्राधिकरण यांनी शासनास कळविले आहे.

४. आरोग्य सेवेतील परिचर्यांचे महत्त्व विचारात घेता सदर महाविद्यालयांनी वाजवी शुल्कासह दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना देणे अपेक्षित आहे. त्यामुळे ए.एन.एम. व जी. एन. एम. अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क

Scanned by CamScanner

निश्चित करण्यासाठी समुचित यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर प्रकरणी महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क नियमन) कायदा, २०१५ या कायद्यातील संबंधित तरतुदी व ए.एन.एम. व जी. एन. एम. अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चिती करणे या अनुषंगाने अभिप्राय देण्याची उच्च व तंत्र शिक्षण विभागास विनंती करण्यात आली होती.

५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांच्या दि.०३.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत राबविण्यात येणा-या ए.एन.एम., जी.एन.एम. इत्यादी परिचर्या पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण हे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या स्तरावरच करण्यात यावे असे कळविले होते.

६. त्यानुसार राज्यातील ए.एन.एम., जी.एन.एम. इत्यादी परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित परिचर्या महाविद्यालयातील ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या स्तरावर खालील प्रमाणे "शिक्षण शुल्क समिती" स्थापन करण्यास व सदर समितीकडून ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. त्यानुसार सदर "शिक्षण शुल्क समिती"ची रचना, कार्यकाल व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

**(अ) समितीची रचना:-**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त, वैद्यकीय शिक्षण , मुंबई | अध्यक्ष |
| २ | संचालक,महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई | सदस्य |
| ३ | अधिक्षिका, शुश्रूषा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| ४ | सहाय्यक संचालक, (लेखा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| ५ | प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई | सदस्य |
| ६ | श्रीमती वैशाली सुळे, उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | सदस्य सचिव |

* सदर समितीस आवश्यकतेनुसार विहीत प्रक्रियेद्वारे सनदी लेखपालाच्या सेवा घेता येतील.

**(ब) समितीची कार्यकक्षा :-** सदर समिती, राज्यातील महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई संलग्नित मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित परिचर्या महाविद्यालयातील ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करील.



Scanned by CamScanner

**(क) समितीची जबाबदारी :-**

१. राज्यातील परिचर्या पदविका महाविद्यालयातील प्रत्येक खाजगी विना अनुदानित ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क लागू करण्यासंबंधी सूत्र तयार करणे व त्यास योग्य प्रमाणात प्रसिध्दी देणे,

२. शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे,

३. दरवर्षी शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करणे,

४. विहीत मुदतीत ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न केल्यास विलंब कालावधीसाठी दंडात्मक शुल्क आकारणीचे दर विहीत करणे,

५. संबंधित महाविद्यालयाचे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी सदर संस्थेची स्थापना, कार्यक्षेत्र, शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम, विद्यार्थी संख्या व त्यासंदर्भात भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, केंद्र शासन, राज्य शासन, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई इत्यादी यांनी विहित केलेले निकष याची माहिती प्राप्त करुन घेणे,

६. शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्याच्या पध्दती, कार्यभार व त्यावरील नियुक्त्या, परीक्षा पध्दती व त्यावरील खर्चाची माहिती घेणे व पुढील पाच वर्षातील संस्थेच्या विकासात्मक कार्याची माहिती घेणे, यासाठी योग्य ती कार्यपध्दती विहीत करणे,

७. महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावात दिलेली माहिती ही वस्तुस्थितीनुरूप असल्याबाबतची खातरजमा करुन / प्रस्तावाची तपासणी करुन विहीत करण्यात आलेल्या सुत्रानुसार संबंधित संस्था/ महाविद्यालयांतील ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क एक महिन्याच्या आत निश्चित करणे,

८. शुल्क प्रमाणित करताना ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीची पडताळणी करुन शुल्क निश्चिती करणे.

९. मात्र यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास वा वाद निर्माण झाल्यास तपासणी पथकामार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन वस्तुस्थितीनुसार तक्रार निवारण करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

१०. महाविद्यालयांनी प्रस्तावित केलेल्या व समितीने निश्चित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी संस्थांनी करुन त्याचा अहवाल शासनास, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळास व आवश्यकतेनुसार भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली इत्यादींना कळविल्याची खात्री करणे व एक प्रत समितीकडे ठेवणे.

११. समितीने निश्चित केलेले शुल्क हे संबंधित अभ्यासक्रमाची तुकडी उत्तीर्ण होवून बाहेर पडेपर्यंत कायम राहील. त्यानुसार प्रतिवर्षी नविन तुकडीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करून घ्यावे लागेल.

**(ड) ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयांकडून शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्कः-**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चित करताना समितीकडे नोंदणी करणे आवश्यक असून त्यापोटी भरावयाच्या नोंदणी शुल्काचे दर खालीलप्रमाणे राहतील:-



Scanned by CamScanner

| क्र. | अभ्यासक्रम | संस्था/विद्यापीठाचे ठिकाण | नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| १ | ए.एन.एम. | राज्यातील महाविद्यालये | १५,००० |
| २ | जी.एन.एम. | राज्यातील महाविद्यालये | १५,००० |
| ३ | मंडळाशी संलग्नित इतर पदविका अभ्यासक्रम | राज्यातील महाविद्यालये | १५,००० |

३. त्यानुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयांनी शुल्क निर्धारणाबाबतचे प्रस्ताव विहित मुदतीमध्ये शिक्षण शुल्क समितीस सादर करणे आवश्यक राहील.

४. तथापि, शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ यापुर्वीच सुरू झाले असून त्याची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. शुल्क नियामक प्राधिकरण,मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ साठी शुल्क निश्चीती केलेली नाही. सबब, अशा सर्व संस्थांना शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी शुल्क नियामक प्राधिकरण,मुंबई यांनी निश्चीत केलेल्या शुल्काप्रमाणे सन २०२२-२३ साठी शुल्क संरचना असावी. तसेच सन २०२२-२३ साठी नव्याने मान्यता दिलेल्या ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची शुल्क निश्चिती नवनियुक्त समितीद्वारे करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.श्री.पु.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
१०. अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार निर्माण भवन, नवी दिल्ली.
१४. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण,मुंबई



Scanned by CamScanner

१५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१६. श्रीमती वैशाली सुळे, उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई
१७. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
१९. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
२०. संचालक, महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई
२१. अधिक्षिका, शुश्रूषा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२२. प्रबंधक, महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई
२३. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई
२४. सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. निवडनस्ती (शिक्षण १)



Scanned by CamScanner